विशेषार्थ - ज्या जीवांना सम्यग्दर्शन प्राप्त झाले आहे, ज्यांचे परिणाम दयेने कोमल झाले आहेत, ज्यांना हिंसा करण्यापासून भय उत्पन्न झाले आहे व जे त्याग करण्याच्या सन्मुख झाले आहेत अशा जीवांना एकेंद्रियादि पृथ्वीकायादिक जीवांच्या हिंसेचा त्याग होऊ शकत नाही. धरादारांचा त्याग करणाऱ्या योगीश्वरांना त्रास व स्थावर अशा दोन्ही हिंसांचा त्याग होऊ शकतो. गृस्थाला गृहकुटुंबावरील ममता प्रत्याख्यानावरण कर्माचा उदय सत्तेत असल्याने कमी होत नाही. म्हणून असा जीवांकरिता त्रस जीवांच्या संकल्पी हिंसेचा त्याग करण्याने त्यांना अहिंसा अणुव्रत घडते असे भगवंतांनी सांगितले आहे.

संकल्पी हिंसेचा त्याग म्हणजे काय( दयाळू गृहस्थ हेतुपुरस्सर त्रस जीवांचा घात करीत नागी, घात करणाऱ्याची मनवचनकायेने प्रशंसा करीत नाही. कोणी दुष्ट प्राणी ईर्ष्येने किंवा द्वेषाने त्याचा घात करू इच्छित असला, अथवा त्याची आजीविका बिघडवू पाहात असला तरी त्याचे काही तरी नुकसान करण्याची इच्छा तो करीत नाही. कोणी त्याला पुष्कळ द्रव्याची लालूच दाखवून अमुक जीवाचा घात कर म्हणून सांगितले तरी तो अत्यंत लहान अशा किडा-मुंगीचा देखील हेतुपूर्वक घात करू इच्छीत नाही. एखादा जीव मारण्याने आपली आपत्ती अथवा रोग नाहीसा होत असला तरी देखील तो आपला जीव वाचेल या आशेने त्रसजीवांचा घात करीत नाही. हिंसा होण्याची त्याला अत्यंत भीती असते. गृहस्थाला आरंभादि क्रियेमध्ये त्रस्त जीवांचा घात होत असतो हे खरे झाले तरी तो कोणत्याही जीवाचा आहार, औषध, देवतार्चन यासाठी म्हणून घात करीत नाही. अशा हिंसेचा त्याग तो करू शकतो. त्यास आरंभी हिंसेचा त्याग होऊ शकत नाही. म्हणून दयामयी धर्माला विरोध न येईल अशा रीतीने त्याने आरंभादि कार्ये करावी. ती करीत असतांना सावधानता बाळगण्यात त्याने कसूर करू नये.

गृहस्थावस्थेत चूल पेटविणे, दळणे, कुटणे, सारविणे, पाणी सोडणे व द्रव्योपार्जन करणे, ही सहा कर्मे तर दररोज करावी लागतात. याशिवाय नित्य व आवश्यक अशाही काही क्रिया करव्या लागतात. उदाहरणार्थ -आपल्या मुलामुलींची लग्न करणे, घरे बांधणे, ती झाडे, सारविणे, स्वच्छ ठेवणे वगैरे. रात्री कोठे जाणे येणे, धातु पाषाण लाकूड वगैरे कापविणे, आंथरूण पांघरूण ठेवणे, उचलणे, भांडी ठेवणे, आपटणे, जातीला जेवण देणे, दिवा जाळणे वगैरे सर्व कार्यामध्ये हिंसा घडून येतेच. गाडीवर किंवा रथावर बसून जाणे, हत्ती-घोड्यावर

बसणे, गाय-म्हैस वगैरे बाळगणे, यामध्ये त्रस्त जीवांचा घात होतोच. देऊळ बांधविणे, दान देणे, पूजन करणे यातही आरंभ आहेच. अशा अवस्थेत गृहस्थाला त्रस्तहिंसेचा सर्वस्वी त्याग करता येणे शक्य आहे काय(

गृहस्थाचे परिणाम वरील क्रिया करण्यात मुख्यत्वेकरून जीवांचा घात करण्याचे नसतात. तो जीवांचा घात व्हावा म्हणून ती कार्ये करीत नसतो. ही कार्ये करीत असताना जीवांचा घात झाला तर बरे असेही तो मानीत नाही. त्याला जीवांचा घात होण्याची मनातून भीती वाटत असते. ती मनात बाळगूनच तो आरंभादि क्रिया करण्यास प्रवृत्त होतो. जीव मारण्याकरिताच तो आरंभ करीत नाही. जीव मारण्याचा त्याचा उद्देशही नाही. अशा अवस्थेत त्याला पापबंध होत नाही, कारण जीव आपल्या आयुष्यानुसार उत्पन्न होतात व मरणात. त्यांचे जगदणे मरणे आपल्या हाती नाही. आपण जितका आरंभ करतो तितका सर्व दयेने प्रेरित होऊन यत्नाचारपूर्वक करीत असतो. अशी क्रिया करणाऱ्याला भगवंतांनी परमागमात हिंसा होत नाही. व त्यास बंधही घडत नाही असे सांगितले आहे. हा संपूर्ण लोक जीवांनी भरलेला आहे. त्यांच्या जगण्यामरण्याशी, आपल्या संकल्प असल्याशिवाय हिंसा अहिंसेचा संबंध येत नाही. हिंसा अहिंसा ही आपल्या परिणामावर अवलंबून आहे. मुनी चार हात जमीन पाहून सावधानतेने गमन करीत असतात, पुढे पाय उचलून ठेवणार इतक्यात जर एखादा जीव बाहेरून उडून त्यांचाया पायाखाली येऊन पडून मरण पावेल तर त्याबद्दल ते जबाबदार नाहीत. कारण मुनी ईर्यासमिती पाळून गमन करीत असल्याने त्यांना हिसेंचा बंध होत नाही. शुद्ध असलेला आहार निरखून घेत असताना जर अचानक त्यात जीव येऊन पडला तर त्या त्यांचा काय दोष( ते जर प्रमादामुले आहार शोधून घेण्यात आळस करतील तर त्यांना दोष लागेल. याप्रमाणे श्रावक जर प्रसाद न करता मोठ्या प्रयत्नाने वागत असेल तर त्याला हिंसेचा दोष लागणार नाही. दिवसा चूल पाहून, स्वच्छ करून लाकडामध्ये काही जीवजंतू आहेत की काय हे पूहून विस्तव पेटविणे, तसेच जाते पाहून झाडून स्वच्छ करून, धान्यातील किडामुंगी सर्व नाहीशी करून, मग ते दळून पीठ करणे वगैरे क्रिया जर तो यथायोग्य करीत असेल, तर त्यात कदाचित् हिंसा घडली तर त्याचा दोष त्याजकडे येत नाही( श्रावक विटलेले अन्न भक्षण करीत नाही. तसेच जागा स्वच्छ करावयाची असल्यास दिवसा कोमल अशा कुंच्याने अथवा इतर प्राण्यांना त्रास होणार नाही, अशा रीतीने हळू हळू केरसुणीने झाडून काढतो. पाणी दुहेरी वस्त्राने यत्नपूर्वक गाळून घेतो. द्रव्योपार्जन देखील आपल्या कुलाचाराप्रमाणे व आपल्या सामर्थ्याप्रमाणे न्यायमार्गाने करीत असतो. द्रव्य-संपादन करीत असताना अन्याय करण्याने जगात आपली अपकीर्ती होईल अथवा ते संपादन करीत असता आपला धर्म सदोष बनेल, अशा रीतीने तो द्रव्य संपादन करीत नाही. तो असि-मसि-कृषि

विद्या-वाणिज्य आणि शिल्प ही सहा कार्मे देखील वरील धोरणानेच करीत असतो. श्रावकाचे व्रत हे चार ही वर्णाला धारण करता येते. आपली उपजीविका जर निर्णल व ज्यात मुळीच हिंसा होत नाही अशा रीतीने होत असेल तर निंद्य कर्म करू न, लोभाच्या वश होऊन पापरू पी अनेक कार्ये करू न आजीविका करू नये. दुसऱ्या कशानेही आपली उपजीविका होण्यासारखी नसेल तरी पापाचे भय बाळगून न्यायाने उपजीविका करण्याचा निश्चयढ ळू देऊ नये.

आपण क्षत्रिय कुलात उत्पन्न झालो तर क्षत्रियाचे जे न्यायकर्म सांगितले आहे त्याचे उल्लंघन करू न दीन-दुर्बलांचा घात करू नये. क्षत्रियाचे कर्म दीन-अनाथ असतील त्यांचे रक्षण करण्याचे आहे. शस्त्ररहित पुरुषाला क्षत्रियाने मारू नये पडलेल्यावर घाव करू नये. पाठ दाखवून पळून जात असेल अथवा दीन झाला असेल त्यावर घाव करू नये. अभिमानाने, वैराने कोणाचा घात करू नये. आपला घात करण्यास येईल अथवा दुर्बल लोकांना कोणी मारू लागले तर त्याचा शस्त्राने विरोध करावा. जो फक्त शस्त्र धारण करू न आपली उपजीविका करीत असेल त्याने स्वामिधर्मामुले शस्त्र धारण करावे अथवा जो अनाथांचा स्वामी असेल त्याने शस्त्र धारण करावे. ज्यांना शस्त्र धारण करू न सेवा करावयाची नाही अथवा ज्याकडे प्रजेचे पालन करण्याचेही काम नाही त्याने स्वरक्षणाशिवाय इतर कार्यासाठी शस्त्र धारण करू नये.

लिहिण्याचा धंदा करू न आपली उपजीविका करीत असेल त्याने कपटवृत्ती सोडून आपल्या धन्याचे इमानाने काम करावे. माळी, जाट इत्यादि कुलामध्ये उत्पन्न झाल्याने दुसऱ्या कोणत्या धंद्यावर उपजीविका करता येत नसेल तर त्यांनी शेतीवाडी करू न आपली उपजीविका करावी. पण तसे करीत असताना दयाधर्माचा त्याग करू नये. जो उपजीविकेसाठी पूर्वीपासून शेतकी करीत आला असेल त्याने त्यातही मर्यादा करू न त्याहून अधिक शेती करणार नाही, असा निश्चय करावा व करीत असलेल्या शेतीविषयी विशेष तृष्णा वाढू न देता त्यातही कमी करणयाची इच्छा ठेवावी. हे कार्य आपणास नाइलाजाने करावे लागत आहे, यात हिंसा फार होत असून पापबंध फार घडतो, दुसरी उपजीविका करता आली असती तर मी यावर कधीही पोट भरले नसते, असा विचार मनात आणून आपली निंदा करीत शेतीवर उदरनिर्वाद करावा. शेतात नेहमी पुष्कळ अगालित पाणी वापरावे लागत असले, तरी स्वत: अगालित पाण्याचा थेंब देखील आपल्या उपयोगाकरिता त्याने वापरू नये. कोणी म्हणेल की ((तुम्ही आपले शेतात नेहमी पुष्कळ झाडे वगैरे तोडीत असता त्याअर्थी अमुक जागेतील झाडे तोडून दिल्यास त्याची किंमत तुम्हास देऊ(( तर लोभाच्या आशेने तसे करण्यास त्याने प्रवृत्त होऊ नये. शेती करण्यात जरी पुष्कळ जीव रमत असले तरी त्याचा अभिप्राय जीवांना मारण्याचा नसतो. आपली उपजीविका व्हावी एवढाच त्याचा अभिप्राय असतो. असे असले तरी कोणी शेकडो रुपये देऊन केले म्हणून

लोभाने तसले पापकृत्य करण्यास प्रवृत्त होऊ नये, कारण य:कश्चित् मुंगीलाही दु:ख पोहोचू नये इतकी ज्याच्य मनात दया उत्पन्न झालेली असते तो जीव शेती मुळी करीतच नाही.

विद्येवर आजीविका करणाऱ्या ब्राह्मणांनी मिथ्यात्व वाढविणाऱ्या व हिंसेची पुष्टी करून राग द्वेष वाढविणाऱ्या विद्या न शिकविता निर्दोष विद्या शिकवाव्या. हाच त्याचा खरा धर्म आहे.

श्रावकाने ज्यात पुष्कळ हिंसा होत असेल व पुष्कळ खोटेपणा करावा लागत असेल असा व्यापार न करता, न्यायाने व प्रामाणिकपणाने व्यवहार करावा. त्यात संतोषवृत्ती ठेवावी, तीव्र लोभ कमी करून, दयाधर्माचे उल्लंघन न करता न्याय्य वागणुकीची भावना मनात कायम ठेवून व्यवहार करावा.

शिल्पकर्म करणाऱ्या शूद्राला देखील श्रावकांची व्रते ग्रहण करता येतात. त्याने अति निंद्य कर्मे असतील त्यांचा त्याग करावा. त्यातून जी टाळता येण्यासारखी नसतील, त्यापैकी ज्यात पुष्कळ हिंसा होत असेल ती तरी निदान टाळावी. मनात सदैव दया जागृत ठेवावी. हेतुपुर:सर जीवांचा घात होतो आहे असे समजले असता तो करू नये. देऊळ बांधविताना, पूजन करताना, दान देताना, नेहमी सावधानी ठेवून फक्त धर्मसाधनासाठीच ही कर्मे करीत आहोत ्से मनात वागवीत जावे. पुरुषार्थसिध्दुपाय ग्रंथात आचार्य अमृतचंद्रदेव म्हणतात.

यत्खलु कषाययोगात्प्राणानां द्रव्यभावरूपाणाम्।

व्यपरोपणस्य करणं सुनिश्चिता भवति सा हिंसा।।४३।। (पु.सि.)

अर्थ - कषायाच्या संयोगाने (रागद्वेषामुळे) इंद्रिय, शरीरादि द्रव्यप्राण व ज्ञानदर्शनादि भावप्राणींचा वियोग करणे हीच निश्चये करून हिंसा जाणावी.

भावार्थ - रागद्वेषादि कषायांच्या वश होऊन द्रव्यप्राण व भावप्राणांचा वियोग करणे हीच खरी हिंसा. ज्यांना कषाय नाहीत त्याजकडून प्राणांचे मरण झाले तरी त्यांना हिसेचे पातक घडत नाही.

अप्रादुर्भाव: खलु रागादीनां भवत्यहिंसेति।

तेषामेवोत्तपत्तिर्हिंसेति जिनागमस्य संक्षेप:।।४४।। (पु.सि.)

अर्थ - रागद्वेषादि विकार आत्म्याचे ठायी उत्पन्न न होणे ही अहिंसा व विकार उत्पन्न होणे ही हिंसा, असा जैनशास्त्राचा सारांश आहे. बाह्य प्राणांची हिंसा घडो वा न घडो आपल्या

मनात रागद्वेषादि विकार उत्पन्न झाल्याबरोबर भावप्राणांचा (शुद्धा विचारांचा) घात होतो व तो झाल्याने आत्महिंसा घडते. आत्माहिंसा ज्यास घडली त्यास परहिंसाही निश्चयाने होते.

युक्ताचरणस्य सतो रागाद्यावेशमन्तरेणापि।

न हि भवति जातु हिंसा प्राणव्यपरोपणादेव ।।४५।। (पु.सिं.)

अर्थ - योग्य आचरण करणाऱ्या सत्पुरुषाला (रागाद्यावेशं अंतरपणे अपि) रागद्वे,ादि कषायाशिवाय देखील (प्राणव्यपरोपणात् एव) केवळ प्राणांचा घात झाल्याने (जातु हिंसा व हि भवंति) मुळीच हिंसा घडत नाही.

भावार्थ - यत्नाचारपूर्वक दयाभाव मनात ठेवून वागणाऱ्या पुरुषाकडून कदाचित् जीवांचा घात झाला तरी त्याला हिंसेचा बंद होत नाही.

व्युत्थानावस्थायां रागादीनां वशप्रवृत्तायाम्।

म्रियतां जीवो मा वा धावत्यग्रे ध्रुवं हिंसा।।४६।। (पु.सि.)

अर्थ - रागद्वेषाच्या स्वाधीन होऊन बेपवाईने जाणे येणे, उठणे, बसणे, ठेवणे वगैरे क्रिया केल्या जातात. त्या करीत असताना जीवांचा घात होवो किंवा न होवो, हिसा निश्चयेकरू न पुढे धावत असते असे समजावे.

भावार्थ - सावधानपूर्वक क्रिया न करता जो क्रियेविषयी बेफिकीर असतो त्याला, जीवांचे मरण त्यांच्या आयुष्याप्रमाणे होवो अथवा न होवो, स्वत:चे परिणाम निर्दय होण्याने हिंसेचा बंध होतोच.

यस्मात्सकषाय: सन् हन्त्यात्मा प्रथममात्मनात्मानम्।

पश्चाज्ज्ायेत न वा हिंसा प्राण्यन्तराणां तु।।४७।। (पु.सि.)

अर्थ - आत्म्यामध्ये कषायांची उत्पत्ती झाल्याबरोबर प्रथमत: तो स्वत:च्या द्वारे आत्मपरिणामांचा घात करू न घेतो. नंतर प्राण्यांची त्याजकडून हिंसा होवो अथवा न होवो.

भावार्थ - ज्यावेळी आत्मा कषायसंयुक्त होतो त्याचवेळी त्याच्या ज्ञानानंद वीतरागस्वरू पाचा घात होऊन चुकतो. त्यानंतर बाह्य जीवांची हिंसा झाली काय किंवा न झाली काय सारकेच.

हिंसायामविरमणं हिंसापरिणमनमपि भवति हिंसा।

तस्मात्प्रमत्त्योगे प्राणव्यपरोपणं नित्यत्।। ४८।। (पु.सि.)

अर्थ - ज्याअर्थी हिंसेविषयी विरक्त न होणे व हिंसेमध्ये प्रवृत्त होणे या दोहोंसही हिंसाच म्हटले आहे, त्यारअर्थी प्रमत्तयोगापासूनच नेहमी हिंसा होते असेच ठरते.

भावार्थ - आपला ्थवा दुसऱ्यांचा घात होईल याबद्दल सावधानी (खबदारी) न ठेवता मनवचनकायेची प्रवृत्ती करणे यांस प्रमत्तयोग म्हणतात. जेथे प्रमत्तयोग आहे तेथे नेहमी हिंसा ठरलेली जो कोणी हिंसा करीत नाही, परंतु हिंसेपासून विरक्त होऊन तिचा त्याग करीत नाही, तो निजलेल्या मांजराप्रमाणे सदाकाल हिंसक आहे. जो नेहमी हिंसा करतो तो तर हिंसक आहेच. या दोघांचे म्हणजे हिंसा करणाऱ्यांचे व हिंसा करीत नसून त्याग ग करणाऱ्यांचे परिणाम सारखेच आहेत. त्यांना हिंसेचे बाह्य निमित्त मिळो व न मिळो.

सूक्ष्मापि न खुलु हिंसा परवस्तुनिबन्धना भवति पुंस:।

हिंसायतननिवृत्ति: परिणामविशुद्धये तदपि कार्या।। ४९।। (पु.सि.)

अर्थ - मनुष्यमात्राला घडणारी सूक्ष्म हिंसा देखील अन्य वस्तु कारण होत नाही. हिंसा करण्याचे त्यांचे परिणाम होण्याने चती घडते. बाह्य वस्तूच्या निमित्ताने जर सूक्ष्महिंसाही होत नसेल तर या बाह्य वस्तूंचा त्याग-व्रत-संयम वगैरे कां करावे( अशी कोणी शंका करील तर त्याचे समाधान असे की ज्यावेळी मनात विचार येईल त्याच वेळी त्याला हिंसा घडेल हे खरे आहे. तरी तो जीव जर हिंसा होण्याच्या जागी जाऊन राहील तर त्याचे परिणाम हिंसेचे झाल्यावाचून कसे राहतील( परिणामाची शुद्धी राहावी म्हणून ज्या ठिकाणी हिंसा घडत असेल अशा सर्व स्थानांचा अर्थात् भोजन, पान, ग्रहण, आसन, वचन, चिंतनादिकांचा त्याग करणे योग्य आहे.

निश्चयमबुद्धमानो यो निश्चयतस्तमेव संश्रयते।

नाशयति करणचरणं स बहि: करणालसो बाल:।। ५०।। (पु.सि.)

अर्थ - निश्चयनयाचे स्वरू प न जाणता म्हणजे शुद्ध आत्मा विषयकषायापासून अलिप्त असतो हे समजून न घेता जो (( आपले पहिणाम कषायरहित आहेत, आपल्या सर्व प्रवृत्तीत हिंसा मुळीच होत नाही.(( अशा विचाराने निरर्गल होऊन यथेच्छ वागतो, त्याच्या मनात बाह्य

आचारणाविषयी निरादर उत्पन्न होतो व त्यामुळे तो करण (परिणाम) चरण (चारित्र) यांचा नाश करणारा होतो.

भावार्थ - ज्याचे परिणाम रागद्वेषरहित झाले असतील तो अयोग्य अशा भोजनपानधनपरिग्रहादि आरंभामध्ये प्रवृत्त होत नाही. जो हिंसेपासून विरक्त झाला असेल तो हिंसा उत्पन्न करण्याच्या कारणांचा त्याग करतो. पुरुषार्थ-सिध्दुपयात असे सांगितले आहे की, कोणी हिंसा मुळीच न करता हिंसेचा भागीदार होतो. जसे शस्त्रे तयार करणारे लोहार, शिकलकार वगैरे लोक प्रत्यक्ष हिंसा मुळीच करीत नाहीत. पण तंदुलमच्छाप्रमाणे त्यांना हिंसेचे फल प्राप्त होतेच. कोणी प्रत्यक्ष हिंसा करीत असूनही त्याचे फल त्याला मिळत नाही. जसे मंदिर बांधविणाऱ्या दयाळू श्रवकाला व यत्नाचारपूर्वक क्रिया करणाऱ्या श्रावकाला प्रत्यक्ष त्रस जीवांची हिंसा होत असूनही हिंसेचे फल प्राप्त होत नाही. कोणा पुरुषाकडून हिंसा अल्प होते. पण ती होत असताना त्याचे परिणाम फार तीव्र असले तर उदयकाली त्या अल्प हिंसेचे फलही तीव्र भोगावे लागते. पु्‍कळ माणसांनी मिळून एखादी हिंसा केली असे समजा. तरी त्या हिंसेचे फल सर्वांना समान मिळत नसते. ज्याचे परिणाम ती हिंसा करीत असता तीव्र झाले असतील त्यास तीव्र फल, ज्याचे मंद असतील त्यास मंद फल व ज्याचे मध्यम असतील त्यास मध्यम फल प्राप्त होते. कित्येकांना हिंसा अजून पुढे करावयाची आहे त्या अगोदरच हिंसेचे परिणाम झाल्याने त्याचे फल उदयास येऊन रस देते. कित्येकांना हिंसा करीत असतांनाच त्याचे फल प्राप्त होते. जसे एका पुरुषाने दुसऱ्याचा प्राण घेता त्याच वेळी प्राण जाणाऱ्यांच्या प्रहाराने याचाही प्राण जातो. कित्येकांना पूर्वी केलेल्या हिंसेचे फल मागाहून प्राप्त होते. कोणी हिंसेचा आरंभ केला पण काही कारणांनी त्याजकडून हिंसा झाली नाही तरी हिंसेचे फल त्यास प्राप्त होतेच. जसे एखाद्याने एकाचा प्राण घेण्याचा उपाय योजिला परंतु काही कारणाने तो उपया फसला. ज्याचा गात व्हावयाचा होता त्याला मागाहून त्याचा हेत समजल्यानंतर त्याने त्याचा प्राण घेतला. हिंसा करणारा एक व त्याचे फल भोगणारे अनेक अशी अवस्था होत असते. जसे चोराला फाशी देणारा चांडाल एक व ती फासी पाहणारे तमासगीर अनेक. या एका चांडालाला व अनेक तमासगीरांना पापबंध होतो. युद्धात हिंसा करणारे योद्धे असतात पण त्याचे फल एका राजाला भोगावे लागते. कोणाला हिंसा केली असतांना हिंसेचे फल भोगावे लागते तर दुसऱ्याला त्याच हिंसेपासून अहिंसेचे फल मिळते. जसे कोणी पुरुष एखाद्या जीवाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करीत असता तो जीव मरण पावला तर तया पुरुषाला त्या जीवाचे रक्षण करण्याचे परिणाम असल्याने अहिंसेचे फल मिळेल. दुसऱ्या कोणा पुरुषाचे परिणाम एखाद्या जीवाचा घात करावा असे होतात अथवा त्याला संकटात घालावे असी त्यास इच्छा होती, पण त्याच्‍य पुण्योदयाने

त्याला काही संकट आले नाही व मरणही प्राप्त झाले नाही, उलट पुष्कळ लाभ झाला. यात त्या घात करण्याची इच्छा कराऱ्याला तर पापाचा बंध पडतोच. दुसऱ्याचे परिणाम कोणालाही दु:ख देण्याचे नव्हते, सुख देण्याचे व त्याचे रक्षण करण्याचे होते. त्यामुळे दुख झाले अथवा तो मरण पावला तरी सुख देण्याचे परिणाम असल्याने त्याला पुण्यबंधच झाला.

यांप्रमाणे अनेक दृष्टींनी विचार करणारा असा हा जिनमार्ग आहे. हा एकांती मिथ्यादृष्टीला समजणे कठिण आहे. त्यासाठी अनेकान्त नयसमूहाला जाणणाऱ्या गुरू लाच शरण गेले पाहिजे. हे भगवंताचे नयचक्र फार तीक्ष्ण असून दुराग्रही मिथ्यादृष्टींच्या युक्ति तवादाचे शतश: तुकडे करू न टाकणारे आहे. म्हणून ज्ञानी पुरुषहो( वीतराग भगवंताच्या आज्ञेचे प्रथमत: हिंसा होण्यायोग्य जी जीवाची स्थाने इंद्रियकायादिक आहेत, त्याचे ज्ञान करू न घ्या. हिंसा करविणारे परिणाम कशाने होतात हे समजून ग्या, हिंसेचे स्वरू प जाणा, हिंसेचे काय फल प्राप्त होणार याचा विचार करा याप्रमाणे हिंस्य, हिंसक, हिंसा, हिंसाफल या चतुष्टयाला मोठ्या परिश्रमाने आधी चांगल्या रीतीने समजून घ्या. मग देशकालानुसार आपल्या परिणामांचा विचार करू न आपला निर्वाह होईल किंवा नाही हे पहा व आपली शक्ति ती न लपविता गृहस्थाश्रमामध्ये आपल्या योग्यतेनुसार हिंसेचा त्याग करा. सर्व क्रिया करीत असताना दया मनात बाळगून मोठ्या सावधानतेने वागा. पंचस्थावर जीवांची हिंसा शक्य य तितकी कमी करू न दयाळू बना, याप्रमाणे अहिंसा अनुव्रताचे लक्षण सांगितले.

अहिंसाव्रताचे पाच अतिचार

छेदनबन्धनपीडनमतिभारारोपणं व्यतीचारा:।

आहारवारणापि च स्थूलवधाद्व्युपरते: पंच।।५४।।

अन्वयार्थ - (छेदन बंधन पीडनं) छेदन म्हणजे मनुष्याचे अथवा तिर्यंचाचे कान, नाक वगैरे अवयव तोडणे हा पहिला छेदनातीचार. मनुष्यांना दोरकंड वगैरे साधनांनी जखडून टाकणे, कैदेत ठेवणे व तिर्यंचांना दृढ बंधनांनी बांधणे, पक्षयांना पिंजर्यामध्ये कोंडून ठेवणे हा दुसरा बंधनातिचार. मनुष्य तिर्यंचांना लाथ, बुक्की, चापट, काठी, चाबूक इत्यादिकांच्या योगाने मारणे हा तिसरा पीडनातिचार. (अतिभारारोपणं) माणसावर पशूवर अथवा बैल जोडलेल्या गाडीवर त्यांच्या शक्ति तीहून अधिक ओझे लादणे हा चौथा अतिभारारोपणातिचार. (आहारवारणा अपि च) मनुष्य तिर्यंचाना खाणे-पिण्याचा प्रतिबंध करणे हा पाचवा आहारवारण अथवा

अन्नपाननिरोधनातिचार म्हणावा. (स्थूलवधाद्व्युपरते: पंच व्यतीचारा:) याप्रमाणे हे स्थूलहिंसा त्यागाचे पाच अतिचार (दोष) आहेत. ते गृहस्थाला सोडणे योग्य आहे.

## सत्याणुव्रताचे लक्षण

स्थूलमलीकं न वदति न परान् वादयति सत्यमपि विपदे।

यत्तद्वदन्ति सन्त: स्थूलमृषावादवैरमणम्।। ५५।।

अन्वयार्थ - (यत् स्थूलं अलीकं न वदति) जो स्थूल असत्य बोलत नाही, (न परान् वादयति) दुसऱ्याकडू नबोलवीत नाही, (विपदे सत्यमपि न वदति) आणि ज्या बोलण्यापासून आपणाला व इतरांनाही संकट येत असेल असे सत्य देखील जो बोलत नाही. (तत्) ते (सन्त: स्थूलमृषावाद-वैरमणं) सत्पुरुषांनी स्थूल असत्याचा त्यागव्रत असे म्हटले आहे.

विशेषार्थ - स्थूल असत्याचा त्याग असणाऱ्या सत्याणुव्रत धारण करणाऱ्या पुरुषाने क्रोध, मान, माया, लोभाच्या वश होऊन एखाद्या जीवाचा धात होईल, एखाद्यावर संकट येईल, अथवा कलंक चढेल असे बोलणे निंद्य आहे. याचप्रमाणे ज्या भाषणापासूनऐकणाऱ्यास मिथ्याश्रद्धान उत्पन्न होईल, तो धर्मपराङ्मुख होण्यास उद्युक्त होईल, व्रतसंयमाचा त्याग करून शिथिल बनेल, त्याचे श्रद्धान बिघडून जोईल, अशा प्रकारचे भाषण कधीही करू नये. ज्या बोलण्यापासून कलह व विसंवाद उत्पन्न होईल, विषयानुराग वाढेल, मोठा आरंभ करण्याकडे प्रवृत्ती होईल, दुसऱ्याला आर्तध्यान उत्पन्न होईल, इतरांना कामवेदना उत्पन्न होतील, दुसऱ्याच्या लाभात विघ्न येईल, दुसऱ्याची उपजीविका नाहीशी होईल, आपली व दुसऱ्याचीही अपकीर्ती होईल, अशा प्रकारचे वचन मुखावटे उच्चारू नये. ज्यापासून आपला व दुसऱ्याचा बिघाड होईल, कोणावर आपत्ती ओढवेल, अनर्थ उत्पन्न होईल, दु:ख प्राप्त होईल. धर्म छेदिला जाईल, राजदंड सोसावा लागेल व द्रव्यहानी होण्याचा संभव असेल अशा प्रकारचे सत्यवचन असेल तरी ते असत्य समजून कदापि बोलू नये. याचप्रमाणे आप्या तोंडावाटे शिवीगाळ, बीभत्स शब्द, हलक्या कुलातील लोकांनी बोलावयाचे श्बद, मर्मच्छेदक वचन, दुसऱ्याचा अपमान होईल असे शब्द तिरस्काराचे शब्द, अहंकाराचे शब्द मुखावाटे कधीही काढू नयेत. बोलावयाचे झालेच तरजिनसूत्राला अनुसरून आपले व इतरांचे हित ज्यायोगे होईल, ज्यात फार पाल्हाळ नसेल असे प्राणिक व संतोष उत्पन्न करणारे, धर्माचा उद्योत करणारे वचन बोलावे. याप्रमाणे न्यायाने आपली उपजीविका करणाऱ्या व अनिंद्य वचन बोलणाऱ्या गृहस्थाला असत्यत्याग नावाचे दुसरे अणुव्रत घडते.

## सत्याणुव्रताचे पाच अतिचार

परिवादरहो(भ्याख्या पैशून्यं कूटलेखकरणं च।

न्यासापहारतापि च व्यतिक्रमा: पंच सत्यस्य।। ५६।।

अन्वयार्थ - (परिवाद-राहे(भ्याख्या) परिवाद, रहोभ्याख्या, (पैशून्यं) पैशून्य, (कूटलेखकरणं च) कूटलेखकरण आणि (न्यासापहारता अपिच) न्यासापहार असे (पंच सत्यस्य) पाच सत्याणुव्रताचे (व्यतिक्रमा:) अतिचार आहेत.

विशेषार्थ - परिवाद म्हणजे मिथ्या उपदेश-स्वर्गमोक्षांचे कारण अशा खोट्या चारित्राचा उपदेश करणे हा परिवाद नामक अतिचार. रहो(भ्याख्या म्हणजे गुप्त गोष्ट प्रसिद्ध करणे. कोणी आपली गुप्त गोष्ट आपणास सांगितली असता ती दुसऱ्यास सांगणे अथवा तिची प्रसिद्धी करणे व स्त्री-पुरुषांची एकांतातील क्रिया पाहून व ऐकून ती प्रगट करणे यास रहोभ्याख्यातिचार म्हणतात. पैशून्य म्हणजे चहाडी करणे दुसऱ्याचे छिद्र समजून घेऊन त्याचे नुकसान करण्याच्या उद्देशाने दुसऱ्यास सांगणे हा पैशून्यातिचार. कूटलेखकरण म्हणजे खोटे दस्तैवज व खोटे जमाखर्च करणे अथवा करविणे व एखाद्या चांगल्या गृहस्थावर आळा घेऊन त्याचा लोकात लिहून अथवा बोलून खोटा प्रचार करणे. न्यासापहार म्हणजे ठेव गडप करणे. कोणी आपल्या जवळ विश्वासने द्रव्य, दागदागिने अथवा मौल्यवान वस्त्रे ठेवून परत मागताना विसरून कमी मागितली असता तेव्ढ्याच वस्तू देऊन बाकीच्या न देणे हा न्यासापहारातिचार होय. याप्राणे स्थूल असत्यत्याग अणुव्रताचे हे पाच अतिचार (दोष) आहेत. ते टाळण्याने व्रत शुद्ध होते.

यासंबंधी व्रती पुरुषाने आपल्या मनात सदैव पुढील विचार आणीत असावे. ((या जीवाने अनादि अनंतकालापासून निगोदामध्ये वास्तव्य केले आहे. कर्मधर्मसंयोगाने तेथून सुटका झाल्यानंतर पंचस्थावर जीवनात असंख्यात काल परिभ्रमण करून पुनरपि निगोदात अनंतानंत काल परिभ्रमण केले आहे. अनंत वेला एकेंद्रिय जीवात जन्म घेतला. त्या ठिकाणी याला जिव्हेन्द्रिय प्राप्त झाले नाही. पुढे द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिन्द्रिय, असंज्ञी, संज्ञी पंचेन्द्रियात उत्पन्न होऊन जिव्हेन्द्रिय प्राप्त झाले तरी अक्षरात्मक शब्द उच्चारण्याचे व ऐकण्याचे यास सामर्थ्य नव्हते, अनंतानंत काल गेल्यानंतर कदाचित् मनुष्य-जन्म प्राप्त झाला व बोलण्याची शक्ती प्राप्त झाली तरी नीच कुलात जन्मल्यामुळे अयोग्य हिंसावचन, असत्य वचन, दुसऱ्याला व आपणाला संताप उत्पन्न होईल असे वचन बोलून याने महान् पाप बांधून घेतले. त्यामुळे दुर्गतीला जावे लागले. याप्रमाणे आपल्याच वचनाने आपला घात करून घेतला. असो( झाले ते गेले( आता काही पूर्वपुण्यसंचितामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, त्याअर्थी चांगले व गोड बोलण्याचा

प्रयत्न करावा. खाणे-पिणे, कामसेवन करणे, डोळ्यांनी पाहणे, कांनांनी ऐकणे या गोष्टी कुत्री, मांजरी वगैरे प्राणीही करीत असतात. कारण डोळे, नाक, तोंड, कान वगैरे इंद्रिये सर्व पशूंनाही असतातच. या गोष्टी आपण केल्या म्हणजे काही विशेष केले असे नाही. मनुष्यजन्मात जर काही श्रेष्ठ असेल तर फक्त वचन हेच एक श्रेष्ठ आहे. ज्याने आपले वचन सांभाळले नाही त्याने आपल्या सर्व जन्माचा बिघाड करून घेतला आहे असे खास समजावे. पशुयोनीत वचन उच्चारण्याची शक्तीनसल्याने आत्म्यातील अनेक गुणदोषांचा स्फोट होऊ शकत नाही. पंडित, मूर्ख, धर्मात्मा, पापी, राव, रंक, कुलीन, अकुलीन, हीनाचारी, सदाचारी, संतु्‌ट, तीव्र लोभी, धर्मवासनायुक्त, धर्मवासनारहित, मिथ्यादृ्‌टि, सम्यग्दृष्टि, संस्कृत, असंस्कृत, उत्तम संगत धरून राजसबेत राहिलेला, ग्रम्य (मुर्ख) लोकांची संगत धरून खेड्यात राहिलेला, व्यवहारचतुर, व्हहार-मूढ , हस्तकलेने युक्त, हस्तकलाज्ञानहीन, उद्योगी, आळशी, शूर, भित्रा, दातार, कृपण, दयाळू, निर्दय, दीन, महंत, क्रोधी, क्षमावान्, मदोन्मत्त, विनयशील, कपटी, सरळ, वक्र परिणामी वगैरे व्यवहार पशुयोनीत होत नाहीत, म्हणून मनुष्य-जन्माची सफळता करून घेण्याची इच्छा असेल तर दुर्लभ अशा सत्यवचन बोलण्याचा निश्चय करा.((

वचनाद्वारे सत्यार्थ उपदेश देऊनच भगवान् अरिहंत त्रैलोक्याला वंदनीय झाले आहेत. त्यांनी सर्व जगाला मोक्षमार्ग दाखविला आहे. वचनाच्या प्रभावानेच अनेक जीवांच्या मिथ्यात्वादि मल नाहीसा करून अजर, अमर-पदाची प्राप्ती भगवंतानी करून दिली आहे. पाच परमेष्ठीत देखील वचनकृत उपकारामुळे भगवान् अरिहंताला प्रथमतः नमस्कार केला गेला आहे. ज्ञानी वीतरागाच्या वचनाने स्वर्गनरकादिक तीन लोकांची प्रत्यक्षासारखे ज्ञान होते. वचनातील स्तयपणाच्या प्रभावामुले पंचमकाळात धर्मप्रवृत्ती अजून दिसून येते.

उज्ज्वल, विनययुक्त, प्रिय अशा वचनरूप पुद्गल परमाणूंनी त्रैलोक्य भरलेले आहे. असले वचन बोलण्यास काही मोल द्यावे लागत नाही. कोणी ापणास काही विचारले असता त्यास गोडीने उत्तर देण्यास आपल्या शरीराला काही वेदना होते असे दिसून येत नाही. आपली जीभ,कंठ, तालू ही घासून गेल्याचे ऐकिवात नाही त्याअर्थी सर्व प्राण्यांना सुख उत्पन्न होईल असे गोड वचन कां बोलू नये( याचे उत्तर नेहमी अभद्र बोलून आपली वाणी भ्रष्ट करणाऱ्यास देता येईल काय(

असत्या वचनाच्या प्रभावानेच मिथ्यादेवाची आराधवना व वेदादिक ग्रंथात यज्ञयागादिक व मांसभक्षणादि कुकर्मे करण्याची प्रवृत्ती झाली आहे. खोट्या शास्त्राची रचना, अनेक प्रकारची खोटी मते, नरकतिर्यंचादि योनीमध्ये परिभ्रमण करविणारा सर्व दुष्ट आचार हा

असत्यवचनप्रचारामुळेच चालू आहे. फार काय पण याच असत्यवचनामुले आपल्याच घरामध्ये अनेक प्रकारचे कलह, विसंवाद, परस्पर वैर, ताडण, मारण, प्राणापहार, क्रोध, भय संताप, अपमानादि प्रकार झालेले प्रत्यही दिसून येतात. सारांश अप्रितितीति अथवा अविश्वास आणि दु:ख याचे मूळ कारण असत्य वचन आहे. असत्य वचनाच्या प्रभावानेच नीचकुलात उत्पत्ती होऊन वरचेवर असत्य वचन मुखावाटे बोलणे भाग पडते व त्यामुळे अनेक जन्मात दारिद्र्य, मुकेपणा, बहिरेपणा, दैन्य वगैरे प्राप्त होते. असत्यवचन सर्व द:खाचे मूळ जाणून तत्काल सोडावे.

सत्यवचनाच्या प्रभावाने जगात मान्यता वढ ते, इतकेच नव्हे पण क्रमाने सर्व देव-मनुष्यावर आज्ञा करणारे इंद्रचक्रवर्तिपद प्राप्त होऊन पुढे संपूर्ण श्रुतज्ञानाचे पारगामी असे गणधरपदही सत्याच्या प्रभावानेच प्राप्त होते. म्हणून असत्याचा त्याग करणे यातच जीवाचे परमकल्याण आहे. पुरूषार्थसिध्दुपाय ग्रंथात श्रीअमृतचंद स्वामी म्हणतात-

हैतौ प्रमत्तयोगे निर्दिष्टे सकलवितथवचनानाम्।

हेयानुष्ठानादेरनुवदनं भवति नासत्यम्।। १००।। (पु.सि.)

भोगोपभोगसाधनमात्रं सावद्यमक्षमा मोक्तुम्।

येते(पि शेषमनृतं समस्तमपि नित्यमेव मुञ्चन्तु।। १०१।। (पु.सि.)

अर्थ - भगवंतांनी सर्व असत्यवचनाचे कारण प्रमत्तयोग आहे से म्हटले आहे. कषायांच्या स्वाधीन होऊन उच्चारणे याला प्रमत्तयोग म्हणतात. त्याज्या पदार्थांना त्याज्य व व्रतादि ग्राह्य पदार्थांना ग्राह्य म्हणणे हे असत्यवचन नव्हे. जे गृहस्थ आपल्या भोपभोगाला साधन असणाऱ्या सदोष वचनांचा त्याग करू शकत नाहीत, त्यांनी अन्य निरर्थक पापबंध करणाऱ्या समस्त असत्य वचनांचा तरी अवश्य त्याग करावा.

भावार्थ - गृहस्थाला जरी व्यवहार करीत असताना भोगोपभोगांच्या साधनासाठी सदोष भाषणाचा पूर्णत: त्याग करता आला नाही तरी त्यामुळे पापबंध होतो ही जाणीव मनात बाळगून शक्य तो त्याचा त्याग करण्याविषयी नेहमी तत्पर असावे. तसेच इतर बहु आरंभ व बहुपरिग्रहाचे व दुर्ध्यानाचे आणि स्वत:ला अथवा इतरांना संताप उपजविण्यास कारण अशा प्रकारच्या सदोष व निंद्य भाषणाचा तरी त्याने अवश्य त्याग केला पाहिजे. याप्रमाणे सथूल असत्यत्याग नावाचे दुसरे अनुव्रताचे स्वरूप आहे.

निहितं वा पतितं वा सुविस्मृतं वा परस्वमविसृष्टम् ।

न हरति यन्न च दत्ते तदकृशचौर्यादुपारमणम् ।। ५७ ।।

अन्वयार्थ - (निहितं वा) कोणी आपले द्रव्य जमिनीत पुरले असेल, अथवा एखाद्या देवळात, घरात अथवा कोठे तरी ठेवले असेल, अथवा आपणाजवळ अनामत ठेवले असेल, आपल्या घरी अथवा दुसऱ्याच्या घरी आपणास न समजता कोणी ठेवून गेला असेल, (पतितं वा) गावात, रस्त्यात, वनात, बागेत वगैरे ठिकाणी कोणी टाकून गेला असेल, (सुविस्मृतं वा) आपणाजवळ देऊन कोणी विसरला असेल, हिशेबात नजरचूक होऊन कोणी कमी मागत असेल, आपल्या घरी विसरून कोणी टाकून गेला असेल, देता घेता मोजण्यात विस्मरण होऊन राहिले असेल अशा प्रकारचे रुपये, मोहरा, आभरण, वस्त्र इत्यादी द्रव्य पुष्कळ असो थोडे असो तरी (अविसृष्टं परस्वं) कोणी दिल्यावाचून ते परधन (न हरति) ग्राहण करू नये व (यन्न च दत्ते) दुसऱ्या कोणास देऊही नये. (तत् अकृशचौर्यात् उपारमणं) याला स्थूलचौर्यत्याग अणुव्रत म्हणतात.

श्रीकार्तिकेय स्वामींनी म्हटले आहे-

जो बहुमुल्लं वत्थुं अप्पमुल्लेण णेव गिण्हेदि।

वीसरियं पि ण गिण्हदि लाहे धूवेहि तूसेदि।। ३३५ ।।

अर्थ - ज्याला स्थूल चोरीला त्याग असेल त्याने पुष्कळ मोलाची व्सतू अल्प किमतीत घेऊ नये. जसे कोणी आपली वस्तू बाजारात नेऊन चौकसी करून विकली असता त्याची किंमत त्यास सव्वा रुपया आली असती तीच वस्तू त्याने आपणाकडे आणली असता लोभाच्या वश होऊन एक रुपयात घेणे हे बहुमोलाची वस्तू अल्प मोलात विकत घेणे होय. दुसऱ्याची विसरलेलेली वस्तूही त्याने घेऊ नये. निर्धन अज्ञानी पुरुषाची वस्तू थोड्या किमतीत मिळाली तर बरे असा विचार पण त्याने कधी मनात आणू नये. त्याने स्वल्प लाभात संतोष धारण करावा.

भावर्थ - व्यापारात थोडा लाभ झाला तरी संतोषवृत्ती ठेवावी. अधिक इच्छा ठेवू नये. अशा रीतीने वागणाऱ्यास स्थूल चौर्यत्याग अणुव्रत घडते.

स्थूल चौर्यत्याग अणुव्रताचे पाच अतिचार

चौरप्रयोगचौरार्थादानविलोपसदृशसम्मिश्राः ।

हीनाधिकविनिमानं पंचास्तेये व्यतीचारा।। ५८।।

अन्वयार्थ - (चौरप्रयोग- चौरार्थादान-विलोप-सद्दशसम्मिश्राः) अचौर्य अणुव्रताचे चौरप्रयोग, चौरार्थादान, विलोप, सदृशसम्मिश्र आणि (हीनाधिकविनिमानं) हीनाधिक विनिमान असे (पंच अस्तेये व्यतीचाराः) पाच अतिचार आहेत.

१) चौरप्रयोग - जो स्वतः चोरी करीत नाही परंतु दुसऱ्यास चोरी करण्याचीप्रेरणा करतो, अथवा चोरी करण्याचा मार्ग दाखवितो त्याला चोरप्रयोग अतीचार घडतो.

२) चौरार्थादान - चोरांनी आणलेले द्रव्य ग्रहण करणे हा चौरार्थादान अतिचार आहे.

३) विलोप - योग्य व न्याय मार्ग सोडून अन्य रीतीने द्रव्य ग्राहण करणे अथवा राजाज्ञेने ज्या वस्तूवर नियंत्रण घातलेले असेल त्या वसतू आणविणे अथवा राजाच्या कायद्याचे उल्लंघन करणे हा विलोपातिचार होय

४) सदृशसम्मिश्र - भारी किमतीच्या व्सतूमध्ये हलक्या किमतीची वस्तु मिळवून ती विकणे, तुपात तेल मिळविणे, अथवा सुवर्णात तांबे घालून ते विकणे हा सदृशसम्मिश्रातिचार जाणावा.

५) हीनाधिकविनिमान - वजन करण्याची तराजू, वजने वगैरे खोटी ठेवणे, ज्यामुले इतरांचे पदार्थ विकत गेतले असता ते जास्त यावेत आपले विकले असता कमी जावेत असा व्यवहार करणे हा हीनाधिक-विनिमानातिचार होय.

याप्रमाणे या व्रताचे पाच अतिचार (दोष) आहेत. हे सोडल्याने अचौर्यव्रत निर्मल होते. जगात चोरी करण्यासारखा दुसरा मोठा अपराध नाही. यापासून कुलाचा व धर्माचा नाश होऊन अपकीर्ती होते. चोरी करून मिळविलेले धनही परस्त्री वगैरे व्यवसनामध्येच खर्च होते. अथवा ज्याच्याजवळ ठेवले ्सेल तोच ते खाऊन जातो. चोरीच्या धनापासून संतोष होत नाही. परिणामामध्ये नेहमी आकुलता रहाते. कधी काळी चोरी उघडकीस आली तर त्याला कैदेची शिक्षा भोगावी लागते व लोकही हाणार करून अनेक प्रकारचे दुःख देतात. तेव्हा इहलोकी कैद, मारपीट, सर्वस्वहरण, हस्तनासिकाछेदन वगैरे दंड प्राप्त होतोच. पण परलोकीही नरकादि गतीमध्ये अनंतकाल परिभ्रमण करावे लागते.

स्थूलब्रह्मचर्य अणुव्रताचे लक्षण

न च परदारान् गच्छति न परान् गमयति च पापभीतेर्यत् ।
सा परदारनिवृत्तिः स्वदारसंतोषनामापि ।। ५९ ।।

अन्वयार्थ - (पापभीतेः यत् न च परदारान् गच्छति) जो पापाच्या भीतीने परस्त्रीकडे स्वतः जात नाही व (न च परान् गमयति) दुसऱ्यास जाण्यास प्रेरणा करीत नाही (सा परदारनिवृत्तिः) त्याला परस्त्रीत्याग नांवाचे चौथे अनुव्रत घडते. (स्वदारसंतोषनाम अपि) यालाच स्वदारसंतोषव्रत असे देखील नांव आहे.

विशेषार्थ - जो पुरुष, आपल्या जातीची, कुलाची स्त्री, जिच्याशी देवगुरु पंचासमक्ष आपला विवाह झाला आहे, तिजविषयी संतोष धारण करून, अन्य सर्व स्त्रीमात्राविषयी भोगोपभोगाची इच्छा करीत नाही, त्याला परस्त्रीत्याग व्रत आहे असे समजावे. तो परस्त्री, वेश्या, दासी, कुलटा, कन्या वगैरे स्त्रियांशी संबंध ठेवीत नाही व कोणत्याही स्त्रीशी कामसेवनाच्या इच्छेने बोलणे, पाहणे स्पर्श करणे वगैरे क्रियेपासून दूर राहतो. अशा पुरुषालाच स्वदारसंतोषी व परस्त्रीत्यागी म्हणावे.

स्वदारसंतोष अणुव्रताचे पाच अतिचार

अन्यिववाहाकरमानङ्गक्रीडाविटत्वविपुलतृषः ।
इत्वरिकागमनं चारसम्रस्य पंच व्यतीचाराः ।। ६० ।।

अन्वयार्थ - (अन्यविवाह-अकरण-अनंगक्रीडा-विटत्व-विपुलतृषः) अन्यविवाहाकरण, अनंगक्रीडा, विटत्व, विपुलतृषा आमि (इत्वरिका गमनं च) इत्वरिकागमन असे (पंच अस्मरस्य व्यतीचराः) पाच स्थूल ब्रह्मचर्यव्रताचे अतिचार आहेत.

१. आपल्या मुलामुलीशिवाय दुसऱ्याच्या मुलामुलींचे विवाह करणे हा अन्याविवाहाकरण अतिचार होय.

२. कामसेवन करण्याच्या अवयवाखेरीज इतर अवयवांनी कामक्रीडा करणे हा अनंगक्रीडातिचार.

३. हिजड्या पुरुषाला स्त्रीचे सोंग देऊन त्याकडून होणार्या क्रिया पाहून संतोष मानणे अथवा तशा क्रिया करिवण्याविषयी मनवचनकायेची प्रवृत्ती ठेवणे हा विटत्व अतिचार होय.

४. कामोपभोगाची तीव्र इच्छा करणे हा विपुलतृषातिचार होय.

५. इत्वरिका म्हणजे व्यभिचारिणी स्त्री, तिच्या घरी जाणे येणे अथवा तिला आपल्या घरी बोलिवणे, तिच्याशी देण्याघेण्याचा व्यवहार ठेवणे, संभाषण करण्याची संधी वरचेवर आणणे व तिच्या स्वरू पाकडे अवलोकन करणे हा इत्वरिकागमनातिचार होय.

याप्रमाणे पाच अतिचार टाळणे पाहिजेत. ज्याला देवादिकाकडून पूज्य अशा ब्रह्मयचर्यव्रताचे रक्षण करावयाचे असेल त्याने आपल्या विवाहित स्त्रीशिवाय इतर माता-बहिण-कन्या-सून वगैरे स्त्रियांपाशी देखील एकांतस्थानी बस नये. अन्य स्त्रियांच्या मुखाकडे टक लावून पाहू नये.

परिग्रहप्रमाणव्रताचे लक्षण

धनधान्यादिग्रन्थं परिमानय ततो(धिकेषु निस्पृहता ।
परिमितपरिग्रहः स्यादिच्छापरिमाणनामापि ।। ६१ ।।

अन्वयार्थ - (धनधान्यादिग्रंथं परिमाय) आपुल्या संतोषाप्रमाणे धन, धान्य, गुरेढोरे, चाकर, माणसे, घरे, शेते, वस्त्र-प्रावरणे वगैरे परिग्रहांचे प्रमाण करून (ततः अधिकेषु निःस्पृहता) त्याहून अधिक पदार्थाविषयी इच्छा न ठेवणे यास (परिमितपरिग्रहः स्यात्) परिमितपरिग्रह अथवा (इच्छापरिमाणनाम अपि) इच्छापरिमाणनामक व्रत असेही म्हणतात.

विशेषार्थ - कोणाजवळ वर्तमानकाली थोडा परिग्रह आहे त्याने जरी अधिक परिग्रहाची इच्छा ठेवून धनाचेप्रमाण बांधले, तरी ती धर्मबुध्दी असून त्याला व्रती म्हणता येते. पण त्याने अन्यायाने धन मिळवावयाचे नाही याबद्दल मनाने पक्का निश्चय केला असला पाहिजे. असे एखाद्यजवळ शंभर रुपयाचा परिग्रह आहे असे समजा, त्याने हजार रुपयापेक्षा जास्त परिग्रह ठेवणार नाही म्हणून प्रमाण केले, तर ते व्रत झाले. परंतु हजार रुपये अन्यायाने ग्रहण करणार नाही असा त्याचा दृढ संकल्प असला पाहिजे. परिग्रहाचे प्रमाण नसल्याने मनुष्यमात्राचे परिणाम निरंतर अनेक वस्तू प्राप् करून घेण्याच चिंतन करीत असतात. त्यामुळे त्याला समाधान नसेत.सर्व पापाचे मूल परिग्रह आहे. सर्व प्रकारचे दुर्ध्यान परिग्रहापासून होते. भगवंतांनी मूर्च्छेला (ममतेला) परिग्रह म्हटले आहे. पाघरावयाला वस्त्र व राहण्यास झोपडी एवढाही परिग्रह नसणाऱ्या पुरुषाला अंतरंगात परवस्तूची तीर्व इच्छा असल्याने परिग्रह म्हटले आहे. परमागमात

अंतरंग परिग्रह - १) मिथ्यात्व, २-४) तीनवेद, ५) क्रोध, ६) मान, ७) माया, ८) लोभ, ९) हास्य, १०) रति, ११) अरति, १२) शोक, १३) भय, १४) जुगुप्सा असा चौद प्रकारचा संगितला आहे.

अनादिकालापासून देहादिक परद्रव्यावरील ममता कमी होत नाही हा मिथ्यात्व परिग्रह. हा देह म्हणजे मी, ही जाति म्हणजे मी, हे कुल म्हणजे मी इत्यादी परद्रव्याविषयी आत्मबुध्दी अनादिकालापासून चिकटून असणेहा मिथ्यात्वाच प्रभाव. रागद्वेषक्रोधादि मोहकर्मापासून उत्पन्न होणाऱ्या विकाराविषयी आत्मपणाचा संकलप हेही मिथ्यात्वच. कामिवकारामुळे चित्त सदैव संतप्त राहणे, राग, द्वेष, क्रोध, मान, माया, लोभ व हास्यिद नोकषाय वगैरे आत्म्याचे आहेत असे मनणे आहा अंतरंग परिग्रह होय. ज्याल अंतरंग परिग्रह नसतात, त्याला बाह्य परिग्रहाविषयी ममता उतपन्न होत नाही, सर्व प्रकराची अनीती प्रिग्रहावरील ममतेपासन उतपन्न होते. परिग्रहाचया इच्छेने हिंसा करावी लागते, खोटे बोलावे लागते, चोरी करावी लागते व व्यभिचार तयार होतो. परिग्रहाकरिताच मठा क्रोध उत्पन्न होतो. परिग्रहाच्या प्रभावाने त्याला मोठा अभिमान उत्पन्न होतो. परिग्रहाकरिता अनेक कपटप्रयोग करावे लागतात, परिग्रहावरील ममतेने महालोभ व पुष्कळ आरंभ करण्यची इच्छा उत्पन्न होते. सारांश, सर्व कषायांचे मूळ हा परिग्रह आहे. म्हणून सर्व तऱ्हेच्या पापापासन मुक्त होण्याची इच्छा असेल तर परिग्रहापासून विरक्त व्हा.

श्रीकार्तिकेयस्वामींनी म्हटले आहे -

को ण वसो इत्थिजणे कस्स ण मयणेण खंडियं माणं ।

को इंदिएहिं ण जिओ को ण कसाएहिं संत्तत्तो ।। २८१ ।।

सो ण वसो इत्थिजणे सो ण जिओ इंदियेहिं मोहेण ।

जो ण य गिण्हदि गंथं अब्भंतरबाहिरं सव्वं ।। २८२ ।।

जो लोहं णिहणित्ता संतोसरसायणेण संतुट्ठो ।

णिहणदि तिण्णा दुट्ठा मण्णंतो णिस्सरं सव्वं ।। ३३९ ।।

जो परिमाणं कुव्वदि धणधण्णसुवण्णखित्तमाईणं ।

उवओगं जाणित्ता अनणुव्वयं पंचमं तस्स ।। ३४० ।।

अर्थ - जगात स्त्रीच्या वश कोण झालेले नाही( कामिवकाराने कोणाचा मान खंडित केला नाही( इंद्रीयांनी कोणाला जिंकिले नाही व कषायाने कोण संतापून गेला नाही ( सर्व संसारी जीव स्त्रीचत्या वश होऊन राहिले आहेत. कामविकाराने सर्वांचा अभिमान नाहीसा केला आहे, इंद्रियांच्या सर्व वश झालेले आहेत व चार प्रकारच्या कषायांनी सर्व जीव जळून चरफडत आहेत. ज्य पुरुषाने बाह्य अभ्यंतर परिग्रह सोडून दिले आहेत, तो मात्र स्त्रीच्य वष झाला नाही, इंद्रियांनी त्यवर पगडा बसविला नाही, मदनाला त्याला वश करता आले नाही व षायानेही तो जळून भसम झाला नाही. जो पुरुष लोभ नाहीसा करून, संतोषरुपी रसायनाने आनंदित होऊन, सर्व प्रकराच्या धनसंपत्तीला विनाशीक जाणतो व दुष्ट तृष्णेला वद्ध्ऊन न देता, धन्य-धान्य-सुवर्ण क्षेत्रादिकांची आपल्या शक्ती प्रमाणे मर्यादा करून राहतो व त्याहून अधिक परिग्रहाची इच्छा ठेवीत नाही त्याला परिग्रहप्रमाणव्रत घडते.

शास्त्रात मूर्च्छेला परिग्रह म्हटले ाहे म्हणून वर सांगितले. ती मूर्च्छा परपदार्थामध्य ममत्वबुध्दी ठेवल्यु होते. परवस्तूच्य ठायी आपलेपणा मानून उतपन्न होणारा राग आत्म्याच्या जीवन-मरण, हित-अहित, योग्य-अयोग्य वगैरे विचाराला नष्ट करून मोहाने सर्व द्रव्याविषयी ((हे मझे हे माझे(( असे परिणाम उत्पन्न करतो. असे परिमाम उत्पन्न होणे हीच मूर्च्छा व हिलाच भगवंतांनी परिग्रह म्हटले आहे. बाह्य परिग्रह थोडा असला किंवा मुळीच नसला तरी तो परिग्रहीच म्हणिवला जातो.

श्रीकार्तिकेयस्वामींनी म्हटले आहे -

बहिरंगथिवहीणा दलिद्दमणुआ सहावदो हुंति ।
अब्भंतरगंथं पुण ण सक्क कदे को वि छंडेदुं ।।३८७ ।।

अर्थ - दरिद्री मनुष्याला बाह्य परिग्रह स्वभावत: नसतोच. हजारो लाखो माणसे आपण नेहमी अशी पाहतो की ज्यांना जन्मातही पितळेचे, तांब्याचे, काशाचे भांडे मिळाले नाही, ज्यांना जन्मभर तुपाचा वास मिळाला नाही मग त्यांचे भक्षण कोठले ( ज्यांना अंगरखे, पागोटे, टोपी ही कधी घालता आली नाही, ज्यांना जन्मभर खाण्यास पोटभर अन्न मिळाले नाही, जयंचा विवाह झााला नाही, ज्यांना दोन चार दिवस खाण्यापुरता धान्याचा संग्रह करता आला नाही, ज्यांना पै पैसा मिळवयाची मारामार त्यांना सोन्या-चांदीचे दर्शन कधी झाले असेल ही शंका कशाला ( सारांश, ज्यंना पर्णकुटी देखील रहावयास नसते अशा मनुष्यांना देखील अंतरंग ममता नाहीशी झाालेली नसते. त्यामुळे ते सर्व मूर्च्छावान् म्हणजे परिग्रही आहेत.

शंका - मूर्च्छेला परिग्रह म्हटले तर बाह्य धन-धान्य-वस्त्र-प्रावरणादिकांना परिग्रह म्हणता येणार नाही.

समाधान - बाह्य परिग्रह, अंतरंग परिग्रह उत्पन्न करण्यास कारण आहेत. धन, धान्य, वस्त्रालंकारादि बाह्य परिग्रह पाहताच ते प्राप्त व्हावे अशी मनात इच्छा उत्पन्न होते, ती आवरणे मनुष्य मात्रास अशक्य झाल्याने त्याच्या प्राप्तीसाठी सारखी धडपड सुरु होते. म्हणून त्यांना मूर्च्छेचे कारण मानले आहे. त्याअर्थी त्या कारणाचा त्याग करणेच प्राप्त आहे.

भगवंतांनी आंतरबाह्य दोन्ही परिग्रहांना हिंसा म्हटले आहे व दोन्ही परिग्रहांचा त्याग करण्यात अहिंसा घडते असे सांगितले आहे. मिथ्यात्व, कषाय, अंतरंग परिग्रह ही हिंसेची दुसरी पर्याय नावे आहेत. बाह्य परिग्रहामध्ये ममत्व ही हिंसाच होय, कृष्ण, नील, कापोत वगैरे लेश्यांचे अशुभ परिणाम परिग्रहावर प्रीती असल्याने मोठमोठे आरंभ हे परिग्रहावरील तीव्र प्रीतीचे परिणाम आहेत. परिणामामध्ये शुध्दता कषाय मंद होण्ाने होत असते. कषायाची मंदता परिग्रहाच्या अभावाने होते. म्हणून परिग्रहावरील सर्वस्वी प्रीती कमी हो असेल तर उत्तम, पण तसे होत नसेल तर परिग्रहाची काही तरी मर्यादा कली पाहिजे. परिग्रह थोडा पण च्छिा पुष्कळ असली तरी कवळ इच्छा असल्ानेच कही प्राप्त नसते. अंतराय कर्माचा क्षायपषम असल तितकाच लाभ होईल. अधिक इच्छा ठेवल्याने तपापाचा बंधच होणार, म्हणून पापाला कारण अशी परिग्रहाची ममता सोडून प्राप्त होईल तेवढ्यात संतोष धारण करू न राहणे योग्य आहे.

समस्त परिग्रहांचा त्याग करणे हा जरी उत्तम पक्ष असला तरी गृहस्थावस्थेत राहून धर्मसेवन करणाऱ्याला आपल्ा योग्यतेप्रमाणे परिग्रह ठेवलयावाचून भागत नाही. गृहस्थाने मुळीच परिग्रह ठेवावयाचा नाही म्हटले तर, काली, अकाली, दुष्काळात, रोग प्राप्त झाला असता, वियोगावस्थेत, मुला-मुलींच्य लग्नकार्यादि समारंभ वगैरे कार्याच त्याजवर जबाबदारी असल्याने ती पुरी पाडता न आल्ास त्याचया मनाला स्थिरता प्राप्त होणार नाही. स्थिरतेचय अभावी तयला यथास्थित गृहस्थकर्म साधारण नाही. गृहस्थधर्मचे रक्षण करण्याकरिता परिग्रहाची आवश्यकता आहे, तयासठी त्यने आपला उदरनिर्वाह न्ययमर्गाने करीत असावे.

साधु पुरुषाने थोडाही परिग्रह ठेवला तर तो इहपरलोकापासून भ्रष्ट होईल व गृहस्थाने परिग्रह ठेवला नाही तर तो भ्रष्ट होईल. जोपर्यंत त्याला गृहस्थाश्रमात रहावयाचे आहे तोपर्यंत त्याला थोडाबहुत परिग्रह ठेवल्यावाचून आपल्या परिणामात शांती ठेवता येणार नाही. आजीविकच्या अभावी निराधार पुरुषाचे परिणाम धर्मसेवन करण्यात स्थिर राहू शकत नाहीत व

तयमुळे परिणामातील वेदनेचे दु:ख नाहीसे होत नाही. पोटापुरते अन्न मिळण्याइतका धंदा-रोजगार केला नाही तर तयाल स्वाध्याय पूजनादि शुभकार्ये करण्याचा उत्साह राहत नाही. पोटाच्या विवंचनेमुळे व्याकुळता वाढ त तजाऊन संतोषाच अभाव होतो.

रोग प्राप्त झाला. म्हतारपण आले, मुलाबाळांचा वियोग झाला वगैरे अनेक संकटे द्रव्याभावी प्राप्त झाली असता अन्न वस्त्राच्या आधाराशिवाय कोमत्याही काळी व कोणत्याही देशात मुष्यमात्राचे परिणाम स्थिर राहणे शक्य नाही. देह सुरक्षित असल्याशिवाय अणुव्रत, शील व संयम वगैरे काहीच धर्मसाधन होऊ शकत नाी. देहरक्षण उपजीविकेच्या साधनाशिवाय होत नाही. यासाठी देशकालानुसार आपले सामर्थ्य पाहून त्याप्रमाणे उद्योग व त्यासाठी लागणाऱ्याइतरांचे सहाय्य मिळवण्यच व न्यायमार्गाने धनसंपादन करण्याचा प्रयत्न करीत राहावे व आपलया पुण्यानुकूलतेने जेवढे प्राप्त होईल त्यात संतोष मनून धर्मसेवन करीत जावे.

अहिंसा व सत्य या पायावर निष्टा ठेवून अन्यायाने परद्रव्य हरण करम्याची इच्छा न धरत आपण परिश्रमपूर्वक उद्योग करू , तर खात्रीने आपल्याबद्दल लोकांत विश्वास उत्पन्न होईल. यासाठी विद्य व कला संपादन करू न आपणांस पात्रता आणणे अवश्य आहे. यानंतर आपल्या लाभांतराय कर्माच्या क्षायोपशमाप्रमाणे जेवढा लाभालाभ अथवा अल्प लाभ होईल त्यात संतुष्ट असावे.

कुटुंबातील माणसांचे पोषण तुम्हास लाभ होईल त्याप्रमाणातच करा. कुटुंबपोषण करीत असताना ऋण होऊ देऊ नका. ऋण होण्याचे मोठे भय बाळगा. एकदा ऋण झाले म्हणजे सर्व आटोपले. ऋ:मी मनुष्याचे धैर्य, शहाणपण वगैरे सर्व नाहीसे होते. तो दीन होतो. एक वेळा पत नाहीशी झाली म्हणजे त्याची उपजीविका देखील होणे कठिण जाते महणून आपल उत्पन्न पाहू खर्च करा. जगात इतर पुण्यवान् अशा श्रीमान् जीवाकडे पाहून जर तुम्ही खर्च करू लागला, तर दरिद्र होऊन तुमचे दोन्ही लोक भ्रष्ट होतील.

वडिलार्जित मोठ्या अब्रूच्या भरीस पडू नका. आमच्या पूर्वजांनी मोठमोठी कार्ये केली ाहेत. त्यात आता न्यूनता कशी करावी ( जर ती कार्ये आता आम्ही करणार नाही तर जगात आमचा दुर्लौकिक होईल. अशा प्रकराचा विचार कधीही मनात आणू नका. ज्याची पुण्याई संपली असेल त्याचा मोठे पणा नाहसा होतो यापुढे संतोषवृत्ती धारण करुन शीलधारण करण्यात, व्रत धारण करण्यात, प्राप्त झालेले दैन्य नाहीसे करण्यात व विषयांची इच्छा कमी करण्यत आता मोठेपणा आहे. यपासून इहपरलोकात सुख प्राप्त होणारे आहे. पुण्योदय प्राप्त होईल त्यावेळी हा

जीव स्वर्गामध्ये महाऋध्दिधारी देवपदी विराजमन होतो. तोच पापाचा उदय प्राप्त झाला ्सता नरकामध्ये अथवा एकेंद्रियात जाऊन जन्मतो. पापाचय उदयाने मनुष्य, रोगी व दरिद्री होतो. तोच उदय तीव्र असेल तर तिर्यंच योनीत उत्पन्न व्हावे लागते. फार दूर कशाला याच जन्मात राजा क्षणात रंक झालेला आपण पहातो, अशा स्थितीत तुमच मोठेपणा कोठे राहणार( तुमच्यजवळ धन ुरले नाही, यचा विचार न करता उधळेपणाने धन खर्च कराल तर दारिद्री व कर्जबाजारी होऊन तमची किंमत जगात उतरू न जाईल. सर्व लोक तुमची निंदा करू लागतील व त्यामुळे तुम्हास अतिशय दु:ख तहोईल. रात्रंदिवस आर्तरौद्रध्यान करू न तुमही दुर्गतीला पात्र व्हाल. म्हणून बाबांनो., आपल्या उतपन्नापेक्षा खर्च अधि करू नका. थोडा खर्च करणे यातच चातुर्य आहे, पंडितपणा आहे हे ध्यानात असू द्या. उतपन्नापेक्षा खर्च कमी करणे यतच शहाणपणा आहे. हाच उत्तम धर्म आहे. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त ठेवाल तर लौकरच दरिद्री व्हाल व तुमही दुनियेत मूर्ख ठराल. ऋणी झाल्यानंतर उत्तम कुलातील योग्य आचार, आदर, सत्कार, वगैरे सर्व नाहीसे होतील. लोक नावे ठेवू लगतील व तुमचे लक्ष ध्यान, पूजन, सवाध्यय, शुभिचंतनामध्ये क्षणभर देखील राहणार नाही. सारांश-उत्पनापेक्षा कमी खर्च करणे हाच गृहस्थाचा खरा धर्म आहे.अभिमानाला पेटून अधिक खर्च करणार्यला, इतरांनी आपणास न दिलेलया द्रव्याकडे चौर्यदृष्टीने पाहण्याची इच्छा उत्पन्न होते. तसेच अनेक प्रकारची खोटी कर्मे, खोटया कल्पना लढवून यन केन प्रकारण कोणास तरी फसवून, पापप्रवृततीने अधिक द्रव्य संपादन केले पाहिजे. असे वाटू लागते, तयमुळे संतषवृत्ती नाहीशी होते.

शंका - कोणी चावर असे महणेल की आजीविका अथवा लाभ हा पूर्वकर्माच्य सवाधीन आहे. पण धर्मसेवन करणे हे तर आपल्ा हातचे आहे ना ( आम्हाल लाभ झाला नाही तरी आम्ही धर्मपाराङ्मुख होणार नाही.

समाधान इत्ाचे असे उत्तर आहे की, लाभ अथवा आजीविका जरी पुण्यकर्माच्या आधीन असली तरी धर्मग्रहण होणे यासही पुण्यकर्माचे सहाय्य लागतेच त्याशिवाय ते होऊ शकत ाही. धर्म म्हणजे अहिंसा ही उत्तम कुलात जन्म झाल्याने पाळता येईल. चांडाळ, भिल्ल वगैरे नीच कुलात जन्म झाला तर तो पालन करता येणार नाही. चांगलया दशात जन्म होणे, इंद्रियांची पूर्णता असणे, रोगरहित शरीर प्राप्त होणे, चांगली संतती प्राप्त होणे, उपजीविकेची काळजी नसणे, धर्मचा उपदेश मिळणे वगैरे सामग्री दानाशिवाय सहजासहजी प्राप्त होत नाही. ज्याला पूर्वपुण्याने उदर-निर्वाहाची काळजी नसेल, त्याला धर्मचरण स्थिर चित्ताने करता येईल. ज्याला सर्व इंद्रिये पूर्म असून शरीर निरोगी असेल, अप्रिय वचन, अविनय, परद्रव्य, परस्त्रीपासून पराङ्मुखता व सतत कार्यप्रवणता, धर्य, समयानुसार भाषण करम्यची शैली वगैरे गुण असतील

त्यास द्रव्यलाभ व धर्मलाभ दोन्ही होऊ शकतात. गुणवान निर्लोभी, उद्योगी व विनयशाली पुरुषाला उपजीविका दुर्लभ नाही. ज्याला आपल्या अंगातील गुणा्ंची व पुरुषार्थाची खात्री असते त्याला आपल्य उपजीविकेची मुळीच काळजी वाटत नाही. लभांतराय कर्माच्या क्षयोपशमाप्रमाणे त्याला थोडी पहुत पण आजीविका खात्रीने प्राप्त होतेच. म्हणून प्राप्त होईल तेवढ्यात संतोष मानून अधिक इच्छा न करतो परिग्रहप्रमाण व्रत धारण करणे योग्य आहे.

पुण्यदयाने उपजीविकेचे साधन प्राप्त झाले असताना अनीतीने वागून ती नाहीशी करू नये. ती नष्ट झाली की त्याबरोबर धर्मही नष्ट होईल. तुम्ही आपल्या मनाने जर नीती सोडणार नाही व न्याय मार्गाने वागण्याचा विश्चय कायम ठेवाल, तर कदाचित असतकर्माच्या उदयामुळे अग्नप्रलयाने, जलप्रलयाने, चोरी होण्याने, राजाच्या उपद्रवाने, आघात होऊन उपजीविका नाहीशी होण्याचा प्रसंग प्राप्त झाला तरी धर्म बिघडणार नाही, तुमची अपकीर्ती होणार नाही व तुमच्यावर असलेला लोकांचा विश्वस नाहीस होणार नाही, म्हणून स्वप्नात देखील अन्यायायने द्रव्योपार्जन करण्याच विचार मनात आणू नका. न्यायाने वागत असतानाही प्रबल लाभांतरायाच्या उदयाने, जर लाभ होत नसेल तरी मनाची समता ठेवा, तयात चलबिचल होऊ देऊ नका. आयुकर्म शेष असेल तर ते भोजनसामग्री आपोआप आणून देईल. कर्म बलवान आहे. रानात, वनात, पहाडात, पाण्यात, शहरात कोठेही असा, अंतरायकर्माचया क्षयोपशमप्रमाणे सर्वाला लाभ होईलच. कित्येक लोक पुण्यकर्माच्या उदयाने अनेकांना अन्न देऊन नंतर आपण भोजन करतात, तर कित्येकांना अर्धे पोट भरण्याइतके तर कित्येकांना एक दिवसापुरते, कित्यकंना दोन दिवसाआड, तर कित्येकांना तीन दिवासंनी एक वेळ व तेही कसले तरी नरीस अन्न मिळते( अशा स्थितीतही धर्मात्मा पुरुषाने आपल्ा मनाच समता सोडू नये. त्यावेळी विचार करावा की, ((पूर्वी आपण कधी तरी पशुयोनीत जन्मलो होतो. त्यवेळी कधी पोट भरू न जेवळ मिळाले( त्या स्थितीत क्षुधातृषेच्या वेदनेने अनेक वेळा मरण पावलो. आता धैर्य धारण करून ज्यायोगे आपला धर्म सुटणार नाही व आपण नीतीच्या शिखरापासून केसभर ढळणार नाही असा प्रयत्न करावा.(( यप्रमाणे विपन्न स्थितीत ज्याचे परिमाम दृढ राहातात त्याला स्वर्गलोकी महर्ध्दिक देवाची पदवी प्राप्त होते.

शंका - कोणी यावर असे म्हणेल की, स्वत:चे परिणाम कदाचित इतके दृढ ठेवता येतील, पण कुटुंबातील सर्व माणसांना असे वाटणे कसे शक्य आहे(

समाधान- त्यावेळी कुटुंबातील मामसांना असा उपदेश करवा, (हे कुटुंबिजनहो, आपण पूर्व जन्मी कोणास दान दिले नाही, व्रत उपोषणे वगैरे केली नाही, मनास वाटेल ते अभक्ष्य

भक्षण केले, अन्यायाने दुसऱ्याचे धन ग्रहण केले, त्या पापाच्या उदयाने आता इतके दरिद्री झालो की, पोटास पुरते अन्न व सस्त्रही मिळण्याची पंचाईत पडू लागली. हे आपण केलेल्या पापाच फल ाहे. आता जर तिर पुण्यवान जीवांच्य वस्त्रभरण-ऐश्वर्याकडे पाहून दु:खी व्हाल तर पुढे याहूनही अधिक अशा पशुगतीच्या दु:खाचे कारण असा व कोटिभवापर्यंत दारिद्र उत्पन्न होण्यासारखा पापबंध होईल. दुसऱ्याची संपत्ती आपल्याला प्राप्त होणार नाही, शोक, दुर्ध्यान, तृष्णा वगैरे केल्याने दु:ख नाहीसे होणार नाही, ुलट दु:ख वाढेल. महणून संतोष धारण करून निर्वाछक बनाल तर दु:ख भासणार नाही व सर्व पापकर्माची अशी निर्जरा होील की, तशी घोर तपश्चरण करूनही होणार नाही. बाबांनो, यवेळी अल्पभोन मिळाले व मनाजोगे शरीर, आच्छादन करण्यपुरती वस्त्रे जरी न मिळाली, तरी परिणामामध्ये व्याकुलता उतपन्न न होऊ देता मोठ्या शांतपणाने रहाल ्तर अशा स्थितीतही हे मोठे तपश्चरणच होईल. कर्माने मला तुमचयामध्य उत्पन्न केले आहे, मी दैव आणि पुरुषार्थ या दोहोंचयाही अनुकूलतेने द्रव्य उपार्जन करण्यच प्रयत्न करीत आहे. यत लाभांतरायचा क्षयोपशम असेल तितकेच न्यायमर्गाने मिळेल ते तुमच्या जवळ आणून देतो. त्यातून माझे वाट्याचे असेल ते मला देून बाकीचे तुम्ही विभागून घ्या. मी आता भगवंतांनी उपदशिलेल्य धर्मच अंगीकार केला आहे. त्याअर्थी तुमच्यकरिता अन्यय, कपट वगैरे पाप करून द्रव्य मिळविणार नाही. न्यायनीतीने व ज्या योगे धर्माला बाधा पोहोचणार नाही अशा तऱ्हेने उद्यग करून धनसंपादन करीन. तुम्हीही माझा धर्म बिघडणार नाही असे वागा. आपल्या पुण्यपापाचा फल भोगा व्याकुलता सोडून मिळेल तेव्हा त्चत संतोष मानून सुखाने रहा((. याप्रमाणे जयाचा नीतीवर व धर्मावर दृढ विश्वास असेल त्यालच स्थूल परिग्रहणपमाण नावाचे व्रत घडते. जे कुटंब-पोषणाकरिता पापक्रिया करमयविषयी प३वृतत होतात व असत्य, हिंसा, चरी इतयादि पाप उपार्जन करतात त्यंना तीव्र पापाचा बंध होतो व त्ामुळे ते दुर्गतीला जातात. यकरिता असात जे तुमचे थोडेसे आयुष्य उरले आहे त्ामध्ये व्रत, शील संयम वगैरे जी धारम केली असतील ती दृढ ठेवम्याच प्रयत्न करा.

कित्येक लोक म्हणतात की, द्रव्य पापापासून प्राप्त होते, पाप केलयिशवाय ते प्राप्त होते नाही. मग आम्ह जर त्यागी अथवा व्रती बनलो तर द्रव् कोठून प्राप्त होणार ( (( पापाशिवाय धन मिळत नाही असे म्हणणे (( हा निव्वळ भ्रम आहे. जर पापापासूनच द्रव्य प्रापत होते असे म्हणावे तर जगात भिल्ल, चांडाल, चोर, चुगलखोर, मनुष्याचा वध करणारे, गावे जाळणारे, वाटमारी करणारे लाखो जीव ाहेत. याचप्रमाणे स४व ब्राह्मण, क्षित्रय, वैश्य शूद्र जातीत पापकर्म करणारे जीव भरलेले ाहेत. ते सर्व पुरष-स्त्री-बालकादि हिंसा करण्यास, असत्य भाषण करण्यास, चोरी करण्यास तयार आहेत. त्ा सर्वाजवळ धन कां नाही पण यातूनही कित्येकाजवळ धन आहे असे

दिसून येते. यचे कारण त्यांनी या जन्मी चोरी-चुगली केल्याशिवाय दखील संपत्ती प्राप्त होते. ते राजकुलात जन्म घेतात अथवा कोट्यिधपती सावकाराचय घरी जन्मतात. हे सर्व पूर्वपुण्याईचे फल आहे. या खोट्या पुण्यापासन प्राप्त झालेल्या लक्ष्मीचा उपभोग घेणारे शेवटी नरकातच योनीत अनंतकाल भ्रमण करतील.

परिग्रहप्रमाण व्रताचे पाच अतिचार

अतिवाहनातिसंग्रहविस्मयलोभातिभारवहनानि ।
परिमितपरिग्रहस्य च विक्षेपाः पञ्च लक्ष्यन्ते ।। ६२ ।।

अन्वयार्थ - (अतिवाहन-अतिसंग्रह-विस्मय-लोभ-अतिभारवहनानि) अतिवाहन, अतिसंग्रह, विस्मय, लोभ आणि अतिभारवहन हे (परिमित परिग्रहस्य) पाचव्या परिग्रहप्रमाण व्रताचे (पंच विक्षेपाः लक्ष्यन्ते) पाच अतिचार सांगितले गेले आहेत.

६. उंट, घोडा बैल इत्यादि तिर्यंचांना व आपल्या दासी-दास सेवकांदिकांना अतिलोभाच्या वश होऊन अमर्याद मजल करिवणे हा अतिवाहन अतिचार म्हणावा.

७. ज्यांची जरूरी पडणार नाही अशा वस्तूंचा आपल्या घरात संग्रह करणे, जसे भोजनपात्रे, वस्त्रे वगैरे थोडी असली तरी चालेल, अथवा धान्य, औषधि, काष्ठ, पाषाणादि धातू वगैरे थोड्या असल्या तरी चालतील, अशी स्थिती असतानाही त्या त्या वस्तूचा विनाकारण फाजील संग्रह करणे हा अतिसंग्रहातिचार म्हणावा.

८. दुसऱ्याची अतुल संपत्ती, पुष्कळ परिग्रह व अनेक देशांच्या वस्तू ज्या कधीही पाहिल्या नाहीत, अशा गोष्टी पाहून अथवा अशा गोष्टींचे वर्णन ऐकून आश्चर्य करणे हा विस्मयात्तीचार होय.

९. कोणत्याही व्यापारात, कोणाचीही सेवा करण्यात, कोणत्याही कलेत आपल्या अंतराय कर्माच्या क्षायोपशमाप्रमामे लाभ झाला असताही तृप्त न होणे, अथवा तेवढ्याात संतोष न मानणे हा अतिलोभातिचार म्हणावा.

१०. बैल, घोडे वगैरे पशूवर त्यांच्या शक्तीपेक्षा अधिक ओढे लादणे हा अतिभार वाहनातिचार होय.

ज्यांना परिग्रहप्रमाण व्रत धारण करावयाचे असेल त्यांनी ह्या पाच दोषांचा त्याग करावा. याप्रमाणे गृॉहस्थांनी धारण करण्यास योग्य अशी पाच अणुव्रते सांगितली.

### अणुव्रताचे फल

पंचाणुव्रतिनधयो निरतिक्रममा: फलन्ति सुरलोकम् ।
यत्रावधिरष्टगुणा दिव्यशरीरं च लभ्यन्ते ।। ६३ ।।

अन्वयार्थ - (निरितक्रमणाः पंचाणुव्रतिनधयः) अतिचाररहित पांच अणुव्रतरूपी निधीपासून (सुरलोकं फलन्ति) स्वर्गलोकरूपी फलाची प्राप्ती होते. (यत्र अवधिः) तेथे अवधिज्ञान आणि (अष्टगुणाः) अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राकाम्य, ईशित्व, वशित्व या आठ ऋध्दी व (दिव्यशरीरं च) धातू-उपधातुरहित तेजःपुंज शरीर (लभ्यन्ते) प्राप्त होते.

भावार्थ - णणुव्रते धारण करणारा मरणानंतर स्वर्गलोकी महान् ऋध्दिधारक देव होऊनच जन्मतो. अन्य पर्याय त्‌ाला प्राप्त होत नाही असा नियम आहे. त्याठिकाणी त्याला दिव्य शरीर प्राप्त होऊन असंख्यात वर्षे सुखसंपदेचा यथेच्छ भोग घेता येतो.

पाच अणुव्रते धार ण करू न या लोकी कण प्रसिध्द झाले त्यंची नांवे इ

### अणुव्रते धारण करणार्यांची नांवे

मातङ्गो धनदेवश्च वारिषेणस्तत: पर: ।
नीली जयश्च संप्राप्ता: पूजातिशयमुत्तमम् ।। ६४ ।।

अन्वयार्थ - अहिंसा अणुव्रतात (मातंगः) मातंग नामक चांडाल, (च) आणि सत्य अमुव्रतात (धनदेवः) धनदेव नावाचा व्यापारी, (पत: परः) त्यानंतर ्चौर्याणुव्रतात (वारिषेणः) वारिषेण नामक राजपुत्र, ब्रह्मचर्य व्रतात (नीली) नीली नावाची एका सावकाराची मुलगी आणि परिग्रहप्रमाणव्रतात (जय:च) जयकुमार, हे जीव (उत्तमं पूजातिशयं प्राप्ताः) व्रताच्य महात्म्याने जगात पूजनीय ठरले. त्याच जन्मात देवांनीही त्यांचा सन्मान केला. व्रतांच्य प्रभावाने अनेक भव्य जीव या जगात कीर्तिमान होऊन देवलोकी गेले, तथापि शास्त्रात यांच्याच कथा प्रसिध्द आहेत.

### पंचापापे करू न दु:ख प्राप्त करू न घेणारे

धनश्रीसत्यघोषौ च तापसारक्षकावपि
उपाख्येयास्था श्यश्रुनवनीतो यथाक्रमम् ।। ६५ ।।

अन्वयार्थ - (श्रमणोत्तमा:) श्रमणोत्तम म्हणजे श्रुतकेवली यांनी, (मद्यमासमधुत्यागै: सह अणुव्रतपंचकं) मद्य, मांस, मधु या तिहींचा त्याग करून पाच अणुव्रतांचे ग्रहण करणे यास (गृहिणां अष्टो मुलगुणान् आहु:) गृहस्थांचे आठ मूलगुण म्हटले आहे.

विशेषार्थ - श्रावकाने मूलगुण अवश्य धारण केले पाहिजेत. ते असे इ

११. कोणाही त्रस जीवांचा संकल्पपूर्वक घात न करणे, हा अहिंसा नामक पहिला मूलगुण.

१२. दुसऱ्याला व स्वत:ला दु:ख उत्पन्न करणारे व सत्य-श्रध्दान, ज्ञान व सदाचरणाचे घात करणारे वचन बोलण्याचा त्याग करणे, हा सत्य नावाचा दुसरा मूलगुण.

१३. कोणीही दिल्याशिवाय पडलेल्या, टाकलेल्या विसरलेल्या परधनाचे ग्रहण करण्याचा त्याग, हा अचौर्य नावाचा तिसरा मूलगुण.

१४. आपल्या कुलाला योग्य अशा विवाहित स्त्रीशिवाय इतर स्त्रीच्या ठिकाणी कामभाव उत्पन्न होू न देणे, हा ब्रह्मचर्य नावाचा चौथा मूलगुण.

१५. न्यायाने उपार्जन केलेल्या द्रव्यादिक परिग्रहांची मर्यादा करून त्याहून अधिक परिग्रह ठेवण्याचा त्याग करणे, हा परिग्रहप्रमाण नावाचा पाचवा मूलगुण.

१६. ज्यापासून आपल्या परिणामात मोह उत्पन्न होऊन हिताहित विचार नाहीसा होतो अशा प्रकारच्या मद्याचा त्याग करणे, हा सहावा मूलगुण.

१७. द्वीद्रियादिक जीवांच्या शरीरापासून उत्पन्न होणाऱ्या मांसाचा त्याग करणे, हा सातवा मूलगुण.

१८. मधमाशांनी साठिवलेल्या पोळीतून उत्पन्न होणाऱ्या मधाचा त्याग हा आठवा मुलगुण होय. ज्या गृहस्थाचा, पाच प्रकारच्या पापांचा मद्य, मांस, मधु या तिहींचा त्याग करण्याचा पक्क निश्चय असतो, त्याने गुणरूप महालाचा पाया घातला असे समजावे. अनादि कालापासून संसारपिरभ्रमणाचे कारण मिथ्यात्व, अन्यय व अभक्ष्य यांा अभाव इ

ााल्यमुळे, अनेक गुणग्रहण करमअयची पात्रता जीवाला प्राप्त होते. म्हणून वरील आठ गुणांचा अंगीकार करणे अवश्य आहे.

दुसऱ्या कित्येक ग्रंथात पाच उदुंबर फळे व तीन मकरांचा त्याग करणे यालाही मूलगुण म्हटले पाच उदुंबर म्हणजे उंबर, वड, पिंपण, पाकर ाणि कुठुंबर (अंजीर) याफलामध्ये पुष्कळसे त्रस जीव प्रत्यक्ष ा दिसून येतात. म्हणून या फळांचे भक्ष ाण करणे मांसभक्ष ाणासारखे आहे. याशिवाय दुसरीही कित्येक फळे आहेत की, ज्यामध्ये बरेच त्रास जीव मेलेले आढळून येतात. अशा प्रकारची फळे भक्ष ाण करम्याची इच्छा अहिंसा व्रताची उपेक्षा अथवा जिव्हेंद्रियाची लालसा होय. त्यातूनही अज्ञानाने ती वाळवून खाणे लालसेची पराकाष्टा म्हटली जाते.

दारू ही मनाला मोह उत्पन्न करणआरी व अचेतन करणारी आहे. मनाला मोह पडला म्हणजे धर्माचे विस्मरण होते. धर्म विसरणारा पुरुष नि:शंकपणे हिंसा करणअयास तयार होतो. मनाला उन्मत्त करू न स्वस्वरुपाची सावधानता विसरविणारा व विषयामध्ये आसक्त ी उतपन्न करू न रसनेंद्रिय व इतर उपस्थ इंद्रियांच्य विषयांच्या ठिकाणी तीव्र वासना उत्पन्न करणारा जो पदार्थ त्याल मद्य म्हणावे. यापउमाणे भांग पिणे, अफू खाणे अथवा नशा येईल अशी कोणतीही वस्तू भक्ष ाण कणे, अथवा नशा येणाऱ्या पदार्थाच्या संयोजनाने उत्पन्न होणार्या मजूम वगरे वसतूंचे भक्ष ाण करणे, यापासून धर्मबुध्दी रहात नाही. सदैव अभक्ष य भक्ष ाणमध्ये अनुरक्त त होण्याने बुध्दीची निर्मलता व परमार्थाचा विचार नाहीसा होतो. म्हणून जिनेश्वराची आज्ञा पालन करू इच्छिणाऱ्यांनी अम्मल (धुंदी) उतपन्न करणार्या सर्व पदा४थांचा अवश्य त्ाग करावा. भांगेमध्य त्रस जीवांची उत्पत्ती फार होते व दारू मध्ये ती अप्रमाण होते. जवताना उत्तम कलातील पुरुषच्यां दृष्टीस दारू चा थेंब पडतात ते भोजनाचा त्याग करतात. कदचित दरू चा स्पर्श झाला तर स्नान करतात. दारू पिऊन उन्मत्त झालेला पुरुष आईला बायको, बायकोला आई समजून त्याप्रमाणे आचरण करण्यास तयार होतो. भय, ग्लानी, क्रोध, काम, लोभ, हास्य, रति, अरति, शोक हे सर्व दोष हिंसेपासून उत्पन्न होणारे आहेत. पण हे सर्व मद्यपी मुष्यातही असतत. त्याअर्थी धर्मग्रहण व्हावे म्हणून मद्यपानाचा त्याग करणे अवश्य आहे.

मांस हे द्वीद्रियादि प्राण्याचा घात करण्यापासून उत्पन्न होते. ते प्रत्यक्ष ा पाहिले असता अतिशय घृणा (किळस) उत्पन्न होते. मांसाचा स्पर्श व दुर्गंधी यांच्या नामोच्चारणानेही परिणामामध्ये भयंकर किळस उत्पन्न होतो जे धर्माचरणाचा तिरस्कार करण्यामुळे नरकाला जाणारे आहेत व ज्यांचे मनात दया नसते ते मांसभक्ष ाण करतात. स्वयं मरण पावलेले बैल, रेडा, हरिण वगैरे पशूंच्या मासामध्ये अनेंत बादर (सूक्ष म) निगोदी जीव व असंख्यात त्रास जीव उत्पन्न

होतात. त्या सर्वांचा मांसभक्षणामुळे घात होतो. कच्चा मांसात व शिजविलेल्या मांसामध्ये देखील अनंत जीव निरंतर उतपन्न होत असतात. यपचप्रमाणे प्रत्येक समयाला त्रस-जातीच जीव उत्पन्न होत असतात. यकरित कच्चे, पक्के अथवा पक्व होत असलेले किंवा वाळलेले मांस जो खातो, किंवा मांसाच्य पेशींना (तुकडयंना) स्पर्श करतो, तो मनुष्य निरंतर संचय होत असलेल्या हजारो जीवांचा घात करतो असे समजावे. मांस भक्षण करणार्याला दया नसते, आचार नसतो. त्यचे जाति, कुल, धर्म, दया, क्षमा इत्यादि सर्व गुण नाहीसे होतात, त्यमुळे तयाल दुर्गती ठरलेली. मंसभक्षण करण्यात धर्म होतो, मंसाने दवता व पितर संतुष्ट होतात, देव मंसभक्षण करणारे आहेत, श्राध्दमध्य ब्राह्मणांना मांसपिंड भक्षण करविल्ाने देव व पितर तृप्त होतात वगैरे मिथ्या शास्त्रात लिहून ठेवणारे महान पापी व निर्दयी आहेत. मिथ्यादर्शनाच्य प्रभावाने तयांना अशी बुध्दी होत असते.

मध भक्षण करणे हेही महान पाप आहे. मधाची उत्पतती कशी होते व तो कोण घेऊन येतो ( मध हे मधमाशाचे वमन आहे. तो भिल्ल, चांडाल वगरे लोक विकण्यासाठी आणतात. पोळीतून तो कढताना तयाचा स्वाद ते घेतात. तयावली त्यंचे उच्छिष्ट त्ात पडतात. यामुळे तोखाण्यस यग्य नव्हे. मधात नेहमी अनंत जीव उत्पन्न होत असतात. मधमाशांची पोळी पिळून मध कढला जातो. अशा प्रकारच्या मधाला पिवत्र मनून त्याला पंचामृत म्हमणे व ते शुध्द आहे असे मानणे यापेक्षा शद्धिवपर्यास सापडणे कठिण ( मधाच एक बिंदू जर कोणी औषधाकरिता ग्रहण करील अथवा रोग दूर होण्याकरिता भक्षण करील, तर त्याला नरकातील भयंकर दु:ख भोगावे लागून असंख्यात नव्हे अनंत जन्मात होगप्राप्ती होते. मद्य, मांस, मध व लोणी ह्या चार महान् विकृती आहेत असे परमागमत महटले ाहे. म्हणून जिनधर्म ग्रहण कर इच्छिणार्यांनी या चोहोंचा त्याग केल पाहिजे. त्याशिवाय धर्माचरण करण्याच पात्रता यत नाही.

धर्म हा अहिंसारूप आहे अशी जिनेश्वराची आज्ञा वरचेवर श्रवण करीत असूनही, ज्यांना स्थावर हिंसेचा तयाग करवत नाही, त्यांनी त्रस हिंसेचा तरी निदान त्यागं करावयास पाहिजे. हिंसेच त्याग नऊ प्रकारांनी करावा. मनाने जे हिंसा करीत नाहीत, करवीत नाहीत, करणाऱ्यास अनुमोदन देत नाहीत, वचनाने हिंसा करा म्हणून कोणास संगत नाही, सांगवीत नाही, व सांगणाऱ्यास अनुमोदन देत नाही, व शरीराने हिंस करीत नाही, करवीत नाही, अथवा करणाऱ्यास प्रोत्साहन देत नाहीत याप्रमाणे मनवचनकायेच्या व कृत-कारित-अनुमोदनाच्या योगाने हिंसेचा त्याग करावा. अशा प्रकाराने ज्याला त्याग करता येतो त्याचा तो औत्ासर्गिक म्हणजे उत्कृष्ट त्याग आहे. या नऊ प्रकारिशवाय जो त्याग आहे त्याला अपवादिक त्याग म्हणतात. त्याचे अनेक प्रकार आहेत. अहिंसा धर्म मोक्षाला कारण व संपूर्ण संसार-परिभ्रमणाचे दु:खरूपी रोग मिटिवणअयास अमृतासारखा आहे. तो प्राप्त झआला असूनही अज्ञानी अशा मिथ्यादृष्टि लोकांचे अयोग्य आचरण पाहून आपण सदसद्विचार सोडू नये. संसारात कर्मांच्या प्रेरणेमुळे वेगवेगळे विचार धारण करणारे जीव दिसून येतात. कित्येक हिंसा करणारे, कित्येक अभक्षय भक्षण करणारे, कित्येक क्रोधी, मानी, मायावी, लोभी, महाआरंभी, महापरिग्रही,

अन्यायमार्गी आहेत. त्या सर्वांची वेगवेगळी कृत्ये पाहून आपण आपले चित्त बिघडू देऊ नये. मिथ्यात्व कर्माच्या उदयाने त्यांना आपण कोण याचा विसर पडला आहे. म्हणून आपण त्याविषयी मनात तटस्थवृत्ती ठेवावी. जिनप्रतिपादित